संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# लोकशाहीच्या उत्सवाला हिंसाचाराचे गालबोट

**देशाला** स्वातंत्र्य मिळून सत्तर वर्षे होत आहेत. आता होणारे मतदान हे सतराव्या लोकसभेसाठी आहे. परंतु अजूनही देशभरात निवडणूक काळात हिंसाचार घडून येतो आणि प्रत्येक निवडणुकीत पाच दहा लोकांचं हमखासपणे बळी जात असतात. यामध्ये राजकीय पक्षांमध्ये आपापसातील मतभेद शिवाय दहशतवाद, नक्षलवाद कारणांमुळेसुध्दा हिंसाचार होतो आणि अनेकांना आपले प्राण गमवावे लागतात. याचा अर्थ जगातील सर्वात मोठी लोकशाही अशी आपण आपली पाठ थोपटून घेत असतानाच आणि निवडणूक म्हणजे लोकशाहीचा उत्सव असल्याचा गौरव करून घेत असतानाच प्रत्येक निवडणुकीत अशा प्रकारचा हिंसाचार व्हावा ही अत्यंत खेदाची आणि शरमेची बाब ठरते. छत्तीसगढच्या दंतेवाडा भागात नक्षलवाद्यांनी स्फोट घडवला त्यात एका आमदारासह चार पोलिसांचा प्राण गेला. तर तिकडे काश्मिरमध्ये किस्तवाड भागात अतिरेक्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नेत्याची हत्या केली. आंध्रप्रदेशात तर मतदानाच्या दिवशीच तेलगू देसम पक्षाच्या नेत्याचा प्राण घेतला गेला. अजून तर निवडणुकीचे चार टप्पे बाकी आहेत. पहिल्या टप्प्यातच सात जणांचे बळी नोंदवले गेले. उर्वरित काळात आणखी कोणकोणता हिंसाचार होईल हे सांगता येत नाही. अशा प्रकारे जर हिंसाचार होत राहिला तर निवडणूक म्हणजे हिंसाचार असे समिकरणच तयार झाले आहे. कारण यापूर्वीच्या निवडणुकांमध्येदेखील यापेक्षाही जास्त रक्तपात झाल्याच्या घटना पाहायला मिळतात. बिहार, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये निवडणूक काळातला हिंसाचार अधिक प्रमाणात घडून येतो. खरे तर जगातल्या इतर लोकशाहीवादी देशांचा विचार केला तर निवडणुका त्यामानाने सुरळीतपणे पार पडतात. हिंसाचार जवळपास नसतोच. लोकशाहीने दिलेला मतदानाचा हक्क यावेळी जनता प्रामाणिकपणे बजावत असते आणि राजकीय पक्षदेखील तितकीच परिपक्वता दाखवतात. असे असताना भारतात मात्र प्रत्येक निवडणुकीत रक्तपात व्हावा ही गोष्ट लोकशाहीची शोकांतिका म्हणूनच नोंदवावी लागते.

### राजकारणाचे गुन्हेगारीकरण

हे असे होण्याची तीन प्रमुख कारणे सांगता येतात. एक म्हणजे भारतातले राजकारण हे सत्तापिपासू झालेले आहे. लोकशाहीच्या संवर्धनापेक्षाही सत्तेसाठी त्याला उत्सवाचे स्वरुप दिले जाते. दुसरा मुद्दा म्हणजे अजूनही लोकांमध्ये मतदानाविषयी किंवा आपल्या सरकार निवडून देण्याच्या कर्तव्याविषयी तितकी प्रगल्भ जाणीव दिसत नाही आणि तिसरा तितकाच महत्वाचा भाग म्हणजे आपल्या देशामध्ये राजकारणाचे तितक्याच मोठ्या प्रमाणावर गुन्हेगारीकरण झालेले दिसून येते. दहशतवादी किंवा नक्षलवादी आपले अस्तित्व सिध्द करण्याकरीता आणि जनतेमध्ये दहशत निर्माण करण्याकरीता हिंसाचार घडवत असतात त्याचा तितकाच कठोर बंदोबस्त सरकारने केला पाहिजे. अजूनही छत्तीसगढ, मध्यप्रदेश किंवा महाराष्ट्राच्या काही भागात नक्षलवाद्यांचा थटथयाट दिसून यावा हेही एक आश्चर्य ठरते. प्रत्येक निवडणुकीत असा हिंसाचार होण्याची परंपरा लक्षात घेऊन पुरेसा आगाऊ बंदोबस्त किंवा कडेकोट सुरक्षा व्यवस्था केली गेली पाहिजे. छत्तीसगढमध्ये नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकांच्यावेळी देखील नक्षलवाद्यांनी हिंसाचार घडवला होता. गेल्या लोकसभा निवडणुकीच्यावेळी एक काँग्रेस नेत्याची हत्या झाली होती. याचा अर्थ सुरक्षा यंत्रणा किंवा देशाचे आणि त्या त्या राज्यांचे गृहमंत्रालय या गोष्टींकडे इतक्या गांभिर्याने लक्ष देत नाहीत असे म्हणावे लागते. वस्तुतः निवडणूक आयोगानेसुध्दा या निवडणूक कालीन हिंसाचाराची अतिशय गांभियाने दखल घ्यायला हवी आणि उपाययोजना करण्याची खातरजमा करून घेतली पाहिज. किंवा सुरक्षा यंत्रणांना निवडणूक काळात अधिक कार्यक्षम राहाण्याची आदेश निवडणूक आयोगाने दिले पाहिजेत. राजकारण्यांच्या या उत्सवासाठी सुरक्षा रक्षकही मोठ्या प्रमाणावर तैनात होतात आणि अनेकवेळेला त्यांचा या राजकीय हिंसाचारामध्ये बळीही जात असतो. सत्तर वर्षामध्ये लोकशाही आणि तिच्या अंतर्गत होणारी ही निवडणूक प्रक्रिया अधिक प्रगल्भ झाली पाहिजे परिपक्व झाली पाहिजे. अनेक जण एवढ्या मोठ्या लोकशाहीत हिंसाचाराच्या चार दोन घटना घडणारच असे म्हणून त्याचे निर्लज्जपणे समर्थनही करतील परंतु या पध्दतीने हिंसाचार चालूच राहाणार असेल तर तो लोकशाहीच्या मूळ तत्वांनाच छेद देणारा ठरतो. यावरून देशातील राजकीय पक्ष, त्यांचे नेते, कार्यकर्ते सुध्दा लोकशाहीसाठी काम न करता केवळ सत्तेसाठी निवडणुकांकडे पाहातात हे स्पष्ट होते.

### निवडणुका पारदर्शक हव्यात

दहशतवाद्यांचा हिंसाचार हा एक स्वतंत्र मुद्दा जरी सोडून दिला तरी राजकारणाचे गुन्हेगारीकरण ही आज अत्यंत चिंतेची बाब झालेली आहे. आज निवडणुकीला उभे राहाणाऱ्या उमेदवारांचा लेखाजोखा जर बघितला तर जवळपास तीस ते पस्तीस टक्के उमेदवारांवर गुन्हेगारी स्वरुपाचे आरोप असतात, काहींवर फौजदारी गुन्हे दाखल झालेले असतात. एवढेच नव्हे तर अनेक जण तुरुंगातून निवडणुका लढवित असतात. ही परिस्थिती कशाचे निदर्शक समजायची. कारण अशा गुन्हेगारी मनोवृत्तीचा पगडा जर आजच्या राजकारणावर असेल तर निवडणूक काळात हिंसाचार होणारच. हे गृहित धरले पाहिजे. म्हणूनच लोकशाहीतल्या निवडणूक नावाच्या सर्वात मोठ्या उत्सवाला सामोरे जात असताना उमेदवार हा स्वच्छ असला पाहिजे. म्हणजेच त्याच्यावर गुन्हेगारी स्वरुपाचे कोणतेही आरोप असता कामा नये. या प्रकारची जर दक्षता घेतली गेली तरी राजकारणाच्या गुन्हेगारीला आळा बसू शकेल आणि हिंसाचारही काही प्रमाणात निश्चितच आटोक्यात येऊ शकेल. निवडणूक कालीन हिंसाचार म्हणजे लोकशाहीला लागलेले गालबोट ठरते. तो संपूर्णपणे संपवण्याची व्यवस्था जोपर्यंत उभी राहात नाही. किंवा जोपर्यंत बिनाहिंसाचार निवडणुका होत नाही तोपर्यंत त्याला लोकशाहीचा उत्सव म्हणणेदेखील चुकीचे ठरते. सर्वात मोठा लोकशाहीवादी देश असे आपण ज्यावेळेला म्हणतो त्यावेळेला त्यातल्या निवडणुका किंवा राजकारण हे अधिकाधिक स्वच्छ आणि पारदर्शकच झाले पाहिजे.